दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। रविवार, दि. १९ जूलै २०२६ । वर्ष १ । अंक १०१ । पाने २ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306
DIGITAL EDITION

भवरखेडे-विवरे विद्यालयात शिक्षक-पालक मेळावा उत्साहात

(पान २ वर)



## Selected

### नशिराबाद: प्रभाग क्र. १ ते ५ मधील एसआयआर SIR नोंदणी

**नशिराबाद:** नशिराबाद शहरातील प्रभाग क्र. १ ते ५ मधील नागरिकांसाठी आज आयोजित करण्यात आलेल्या एसआयआर (SIR) नोंदणी शिबिरास नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. नशिराबादमधील विविध प्रभागांमध्ये हे शिबिर पार पडले, ज्यामध्ये प्रामुख्याने आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, रेशन कार्ड आणि मोबाईल क्रमांकाची नोंदणी करण्यात आली. शिबिराच्या यशस्वी आयोजनामुळे नागरिकांना त्यांच्या आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे सोपे झाले. प्रभाग क्र. १ (किरण चौधरी यांच्या घराजवळ), प्रभाग क्र. २ (श्री कृष्ण मित्र मंडळ जवळ), प्रभाग क्र. ३ (फ्रुटसेल चौक), प्रभाग क्र. ४ आणि प्रभाग क्र. ५ (ग्रामपंचायत कार्यालय जवळ) या पाचही ठिकाणी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.

## ठाकरे गटाची कायदेशीर लढाईची घोषणा, उद्धव ठाकरे यांना मोठा राजकीय धक्का

# सहा खासदारांच्या विलिनीकरणाला मंजुरी!

## शिंदे गटाचे लोकसभेतील संख्याबळ वाढले, दानवे यांचा निर्णयाला तीव्र विरोध

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई । महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठी घडामोड घडली असून, उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतून बंडखोरी केलेल्या सहा खासदारांच्या शिंदे यांच्या शिवसेनेतील विलिनीकरणाला लोकसभा सचिवालयाने अधिकृत मंजुरी दिली.**

या निर्णयामुळे ठाकरे गटाला मोठा राजकीय धक्का बसला असून, शिंदे गटाचे लोकसभेतील संख्याबळ अधिक मजबूत झाले आहे. दरम्यान, या निर्णयाला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने तीव्र विरोध दर्शवत न्यायालयीन लढाई लढण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. माजी केंद्रीय कायदामंत्री अश्वनी कुमार यांनीही आंदोलनस्थळी भेट देत वांगचुक यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.लोकसभा सचिवालयाच्या निर्णयानंतर ठाकरे गटाचे विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना या निर्णयावर गंभीर



आक्षेप नोंदवला. "कोणताही सदस्य स्वतःहून विलिनीकरण करत नाही.
त्यामुळे लोकसभा अध्यक्षांनी दिलेल्या निर्णयाला कायदेशीर आधार नाही. आम्ही हा निर्णय न्यायालयात आव्हान देणार असून कायदेशीर मार्गाने लढा देऊ," असे दानवे यांनी स्पष्ट केले. लोकसभा अध्यक्षांना यापूर्वी पाठवलेल्या पत्राला अद्याप उत्तर मिळाले नसल्याचाही दावा त्यांनी केला.
"लोकशाही, नियम आणि कायदे यांची पायमल्ली होत आहे.
जर नियमांचाच विचार केला जाणार नसेल, तर ते बनविण्याचा उपयोग काय?" असा सवालही त्यांनी उपस्थित केला. या निर्णयामुळे आता धाराशिवचे ओमराजे निंबाळकर, परभणीचे संजय (बंडू) जाधव, शिर्डीचे भाऊसाहेब वाकचौरे, यवतमाळ-वाशीमचे संजय देशमुख, हिंगोलीचे नागेश पाटील आष्टीकर आणि मुंबई उत्तर-पूर्वचे संजय दिना पाटील हे अधिकृतपणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा भाग ठरले आहेत.या विलिनीकरणामुळे लोकसभेत शिंदे गटाचे संख्याबळ वाढले असून राष्ट्रीय राजकारणातही त्यांची ताकद अधिक बळकट झाली आहे.

### शिवसेनेतील राजकीय संघर्षाला नवे वळण

दुसरीकडे, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत नऊ खासदार निवडून आणणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडे आता केवळ तीन खासदार उरले आहेत. राजकीय विश्लेषकांच्या मते, या निर्णयामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय समीकरणांवर दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे. शिवसेनेतील अंतर्गत संघर्ष आता केवळ राजकीय पातळीवर न राहता कायदेशीर लढाईच्या टप्प्यात पोहोचला आहे. दरम्यान, ठाकरे गटाने हा निर्णय घटनात्मक आणि कायदेशीरदृष्ट्या चुकीचा असल्याचा दावा करत न्यायालयीन लढाई लढण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. त्यामुळे या प्रकरणाचा पुढील अध्याय आता न्यायालयात रंगण्याची शक्यता असून, लोकसभा सचिवालयाच्या निर्णयावर अंतिम शिक्कामोर्तब न्यायालयीन प्रक्रियेनंतरच होणार आहे. या घडामोडींमुळे महाराष्ट्रातील शिवसेनेतील राजकीय संघर्षाला नवे वळण मिळाले असून, येत्या काही दिवसांत या प्रकरणावर आणखी महत्त्वाच्या घडामोडी घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

## वाढदिवसाचा अनोखा आदर्श! सफाई कर्मचाऱ्यांच्या हस्ते केक

### पावसाळ्यात रेनकोटची भेट




**जन सम्राट टाईम्स**

**भडगाव| प्रतिनिधी:** आजच्या काळात वाढदिवस मोठ्या थाटामाटात साजरे करण्याची स्पर्धा सुरू असताना, समाजासाठी अहोरात्र कष्ट करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करत वाढदिवस साजरा करण्याचा प्रेरणादायी आदर्श शिवसेना-युवासेना आणि स्व. बापूजी युवा फाउंडेशन यांनी घालून दिला. कु. लक्षिता लखीचंद पाटील हिच्या वाढदिवसानिमित्त नगरपालिका सफाई कर्मचाऱ्यांना मोफत रेनकोटचे वाटप करण्यात आले. शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी कोणत्याही ऋतूची पर्वा न करता कार्यरत असलेल्या सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. विशेष म्हणजे, वाढदिवसाचा केक सफाई कर्मचाऱ्यांच्या शुभहस्ते कापण्यात आला. या आगळ्यावेगळ्या उपक्रमामुळे उपस्थित कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद झळकत होता. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सफाई कर्मचाऱ्यांना रेनकोट भेट देत त्यांच्या आरोग्याची व सुरक्षिततेची काळजी घेण्याचा संदेशही देण्यात आला. समाजासाठी निस्वार्थपणे कार्य करणाऱ्यांचा सन्मान हीच खरी समाजसेवा असून, "स्वतःचा आनंद समाजाच्या सेवेत वाटला, तरच वाढदिवस खऱ्या अर्थाने संस्मरणीय ठरतो," हा संदेश या उपक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला. यावेळी गटनेते लखीचंद पाटील, नगरसेवक संतोष महाजन, जग्गू भोई, अतुल पाटील, जहांगीर मालचे, देवाजी आहिरे, विजयकुमार भोसले, राहुल ठाकरे, महेंद्र ततार, वाल्मिक पवार, पिंटू मराठे, भोला पाटील तसेच फाउंडेशनचे पदाधिकारी, संचालक, सदस्य आणि अनेक मान्यवर उपस्थित होते. समाजसेवा, सामाजिक बांधिलकी आणि कर्तव्यनिष्ठ कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता या तिन्ही मूल्यांचा सुंदर संगम या उपक्रमातून पाहायला मिळाला. त्यामुळे हा वाढदिवस केवळ एका व्यक्तीचा उत्सव न ठरता समाजासाठी प्रेरणादायी संदेश देणारा ठरला.

## हातात माती... मनात निसर्ग! सीड बॉलमधून विद्यार्थ्यांनी पेरली हरित भविष्याची बीजे

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | प्रतिनिधी :** एखाद्या मुलाच्या हातात असलेला मातीचा छोटासा गोळा उद्याच्या हिरव्यागार जंगलाचे बीज ठरू शकतो, याची प्रचिती अनुभूती बालनिकेतन मॉन्टेसरी व अनुभूती विद्यानिकेतन येथे भरलेल्या *'अनुभूती ट्री फेस्टिव्हल'*मध्ये पाहायला मिळाली. दि. १३ ते १८ जुलैदरम्यान आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्साहाने सीड बॉल (बीजगोळे) तयार करून पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश दिला. माती, सेंद्रिय खत आणि स्थानिक वृक्षांच्या बियांचा वापर करून तयार करण्यात आलेले सीड बॉल विद्यार्थ्यांसाठी केवळ एक उपक्रम न राहता, निसर्गाशी भावनिक नाते जोडणारा संस्मरणीय अनुभव ठरला. प्रत्येक विद्यार्थ्याच्या चेहऱ्यावर उत्सुकता, हातात माती आणि मनात हिरवे भविष्य घडविण्याचे स्वप्न दिसत होते. जैन इरिगेशनचे सहव्यवस्थापकीय संचालक अजित जैन, अनुभूती स्कूलचे अध्यक्ष अतुल जैन, संचालिका निशा जैन व अंबिका जैन यांच्या प्रेरणेतून हा उपक्रम राबविण्यात आला. प्राचार्य मनोज परमार यांच्यासह शिक्षक व कर्मचाऱ्यांनीही या उपक्रमाला



सक्रिय साथ दिली. जैन इरिगेशनच्या गार्डन विभागाचे अजय काळे, गिरीष जगताप, पर्यावरण विभागाचे राजेंद्र राणे, मयूर देशमुख तसेच सर्व ताई-दादांनी विद्यार्थ्यांना सीड बॉल तयार करण्याची वैज्ञानिक पद्धत समजावून सांगितली. देशी वृक्षांच्या बिया, माती आणि नैसर्गिक खताचा वापर करून विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने बीजगोळे तयार केले. हे सीड बॉल पावसाळ्यात डोंगराळ, दुर्गम व ओसाड भागात टाकल्यास योग्य वातावरण मिळाल्यावर त्यातून रोपे उगवून नैसर्गिकरीत्या हरितक्षेत्र वाढण्यास मदत होते. तसेच जैवविविधतेचे संवर्धन आणि नैसर्गिक वनस्पतींच्या पुनरुज्जीवनालाही हातभार लागतो, अशी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. समारोप कार्यक्रमात संचालिका अंबिका जैन यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना सीड बॉलचे वितरण करण्यात आले. यावेळी त्या म्हणाल्या, "हात, हृदय आणि बुद्धी (HAND, HEART AND HEAD) यांच्या समन्वयातून तयार झालेला सीड बॉल हा निसर्गाशी जोडणारा अनुभव आहे. विद्यार्थ्यांनी 'ग्रीन ॲम्बेसेडर' बनून अधिकाधिक वृक्ष लागवड करावी, त्यांचे संगोपन करावे आणि पर्यावरण संरक्षणाला जीवनशैलीचा भाग बनवावा." प्राचार्य मनोज परमार यांनी सांगितले की, खेळता-खेळता विद्यार्थ्यांनी बीजसंवर्धन, जैवविविधतेचे महत्त्व आणि पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी आत्मसात केली. पर्यावरण रक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, ही जाणीव विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्यात या उपक्रमाला यश आले.

## पारोळा–कजगाव रस्त्याच्या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह; निकृष्ट कामाचा स्थानिकांकडून आरोप

**जन सम्राट टाईम्स**

**पारोळा| प्रतिनिधी :** पारोळा–कजगाव मार्गावरील सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाच्या गुणवत्तेबाबत स्थानिक नागरिकांनी गंभीर आक्षेप घेतले आहेत. काम निकृष्ट दर्जाचे होत असून सिमेंट काँक्रीटमध्ये आवश्यक प्रमाणात पाणी वापरले जात नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, प्रत्यक्ष पाहणीदरम्यान सिमेंट मिश्रण कोरडे असल्याचे दिसून आले. त्यामुळे रस्त्याच्या टिकाऊपणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून भविष्यात रस्ता



लवकर खराब होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.या कामाची संबंधित विभागाने तातडीने तांत्रिक तपासणी करावी, कामाची गुणवत्ता प्रयोगशाळेत तपासावी आणि निकृष्ट काम आढळल्यास संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. दरम्यान, हे काम कोणत्या कंत्राटदारामार्फत सुरू आहे, याबाबत विविध चर्चा सुरू असून संबंधित यंत्रणेकडून अधिकृत माहिती मिळाल्यानंतरच त्याबाबत स्पष्टता होऊ शकणार आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, प्रत्यक्ष पाहणीदरम्यान सिमेंट मिश्रण कोरडे असल्याचे दिसून आले. त्यामुळे रस्त्याच्या टिकाऊपणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून भविष्यात रस्ता लवकर खराब होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.या कामाची संबंधित विभागाने तातडीने तांत्रिक तपासणी करावी, कामाची गुणवत्ता प्रयोगशाळेत तपासावी आणि निकृष्ट काम आढळल्यास संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## निवृत्ती वेतनधारकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासन कटिबद्ध

### जिल्हा परिषदेत पेन्शन अदालत



**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | प्रतिनिधी :** सेवानिवृत्त कर्मचारी हे जिल्हा परिषदेच्या परिवाराचा अविभाज्य घटक असून त्यांच्या समस्या संवेदनशीलतेने आणि प्राधान्याने सोडविण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासन कटिबद्ध आहे. तसेच सर्व विभागांनी निवृत्ती वेतनधारकांप्रती सहकार्याची व सहानुभूतीची भूमिका ठेवावी, असे निर्देश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांनी दिले. जिल्हा परिषद मुख्यालयातील छत्रपती शाहू महाराज सभागृहात बुधवारी (दि. १५) आयोजित पेन्शन अदालत (तक्रार निवारण सभा) प्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनोज चौधर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी विनोद चावरिया, शिक्षणाधिकारी निलेश पाटील, लेखाधिकारी उदय कुलकर्णी, विविध विभागांचे अधिकारी तसेच सेवानिवृत्ती वेतनधारक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. सभेदरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांनी सेवानिवृत्ती वेतनधारकांच्या विविध समस्या आणि अडचणी जाणून घेतल्या. निवृत्ती वेतन, उपदान, गटविमा, प्रलंबित देयके तसेच दैनंदिन कामकाजातील अडचणींबाबत संघटनेच्या प्रतिनिधींनी आपली मते मांडली. उपस्थित करण्यात आलेल्या प्रत्येक मुद्द्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी करिश्मा नायर म्हणाल्या की, सेवानिवृत्ती वेतनधारकांची सर्व प्रकरणे नियमांच्या अधीन राहून तातडीने निकाली काढण्यासाठी प्रशासन आवश्यक ती कार्यवाही करेल. तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना किरकोळ कामांसाठी वारंवार जिल्हा परिषदेच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत, यासाठी कार्यपद्धती अधिक सुटसुटीत, पारदर्शक आणि सुलभ करण्यात येईल. या प्रसंगी सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांचा सत्कार करण्यात आला.
पेन्शन अदालतीच्या माध्यमातून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून त्यांचे त्वरित निराकरण करण्यासाठी सकारात्मक संवाद साधण्यात आला. प्रशासन आणि निवृत्ती वेतनधारक यांच्यात समन्वय वाढविण्यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन पुढील काळातही नियमितपणे करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. सेवानिवृत्त कर्मचारी हे जिल्हा परिषदेच्या परिवाराचा अविभाज्य घटक असून त्यांच्या समस्या संवेदनशीलतेने आणि प्राधान्याने सोडविण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासन कटिबद्ध आहे. तसेच सर्व विभागांनी निवृत्ती वेतनधारकांप्रती सहकार्याची व सहानुभूतीची भूमिका ठेवावी, असे निर्देश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांनी दिले.


जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

## ग्रा.पं. निवडणुकांची तयारी; निवडणूक आयोगाद्वारा मतदार यादी कार्यक्रम जाहीर

### २४ जुलैला यादी प्रसिद्ध; २९ जुलैपर्यंत हरकती, ४ ऑगस्टला अंतिम यादी प्रकाशित होणार

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई। प्रतिनिधी:** राज्यातील बिगर व अंशतः अनुसूचित क्षेत्रातील मुदत संपलेल्या, मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांची तयारी वेगाने सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत निवडणुकांसाठी प्रभागनिहाय मतदार यादी तयार करण्याचा सविस्तर कार्यक्रम जाहीर केला आहे. आयोगाने यासंदर्भातील अधिकृत आदेश १५ जुलै २०२६ रोजी जारी केला असून, निवडणूक प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा आता सुरू होणार आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के आणि २४३-झेडए अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे नियोजन, पर्यवेक्षण आणि नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर आहे. त्यानुसार सन २०२४, २०२५ मध्ये मुदत संपलेल्या, सन २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींसाठी ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. आयोगाच्या आदेशानुसार १५ एप्रिल २०२६ रोजी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी ग्रामपंचायत निवडणुकांसाठी आधार म्हणून वापरण्यात येणार आहे. ही यादी संगणक प्रणालीद्वारे प्रभागनिहाय विभाजित करून प्रारूप आणि अंतिम मतदार याद्या तयार करण्यात येतील. यासाठी महाआयटीने विकसित केलेल्या विशेष सॉफ्टवेअरचा वापर करण्यात येणार असून, जिल्हाधिकारी आणि तहसील कार्यालयांना त्यासाठी



स्वतंत्र युजर आयडी आणि पासवर्ड उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. आयोगाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार २४ जुलै २०२६ रोजी प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. त्यानंतर २४ ते २९ जुलै या कालावधीत मतदारांना हरकती आणि सूचना दाखल करण्याची संधी दिली जाणार आहे. प्राप्त हरकतींची छाननी करून आवश्यक दुरुस्त्या करण्यात आल्यानंतर ४ ऑगस्ट २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल.
आयोगाने स्पष्ट केले आहे की, हरकतींच्या माध्यमातून केवळ लेखनातील त्रुटी, चुकीच्या प्रभागात समाविष्ट झालेले मतदार अथवा विधानसभा मतदार यादीत नाव असूनही ग्रामपंचायत मतदार यादीत नाव वगळले गेले असल्यास अशा स्वरूपाच्या मर्यादित दुरुस्त्याच करता येणार आहेत. विधानसभा मतदार यादीत नवीन नावांचा समावेश, नावे वगळणे किंवा पत्त्यात बदल करण्याची प्रक्रिया या टप्प्यावर करता येणार नाही. प्रारूप आणि अंतिम मतदार याद्यांना व्यापक प्रसिद्धी देण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत. ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय, पंचायत समिती, तहसील कार्यालय, स्थानिक वृत्तपत्रे तसेच केबल टीव्हीच्या माध्यमातून या याद्या नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहेत. याशिवाय संपूर्ण प्रक्रिया विहित मुदतीत आणि त्रुटीरहित पार पाडण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी आणि तहसीलदारांवर सोपविण्यात आली आहे. ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्या तयार करण्याचा हा कार्यक्रम अत्यंत महत्त्वाचा मानला जात असून, पात्र मतदारांनी प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यानंतर आपले नाव, प्रभाग आणि तपशील तपासून आवश्यक असल्यास विहित मुदतीत हरकती अथवा सूचना सादर करण्याचे आवाहन राज्य निवडणूक आयोगाने केले आहे.

### मर्यादित दुरुस्त्या करता येणार

हरकतींच्या माध्यमातून केवळ लेखनातील त्रुटी, चुकीच्या प्रभागात समाविष्ट झालेले मतदार अथवा विधानसभा मतदार यादीत नाव असूनही ग्रामपंचायत मतदार यादीत नाव वगळले गेले असल्यास अशा स्वरूपाच्या मर्यादित दुरुस्त्याच करता येणार आहेत. विधानसभा मतदार यादीत नवीन नावांचा समावेश, नावे वगळणे किंवा पत्त्यात बदल करण्याची प्रक्रिया या टप्प्यावर करता येणार नाही.

# आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त धुळ्यात हरित अभियान; दुसऱ्या टप्प्यात 1 हजार वृक्षरोपांचे मोफत वाटप

## पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** माजी पर्यावरण मंत्री तथा आमदार आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने धुळ्यात व्यापक हरित अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात नागरिकांना एक हजार वृक्षरोपांचे मोफत वाटप करण्यात येत असून, उपक्रमाला शहरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. युवासेना राज्य सहसचिव ॲड. पंकज गोरे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येत असून, केवळ वृक्षरोपांचे वितरण न करता प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे नियमित संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले. वृक्षलागवड ही



केवळ एक दिवसाची औपचारिकता नसून भविष्यातील पिढ्यांसाठी पर्यावरण समृद्ध करण्याची सामाजिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. वाढते तापमान, हवामानातील बदल, घटते वनक्षेत्र, भूजल पातळीतील घट आणि प्रदूषणाच्या वाढत्या समस्यांच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाची गरज अधिक तीव्र झाली आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक घरासमोर, शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक ठिकाणे, शेताच्या बांधावर तसेच मोकळ्या जागांमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड व्हावी, या उद्देशाने हे अभियान राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत फळझाडे, सावलीची झाडे तसेच पर्यावरणपूरक विविध प्रजातींची वृक्षरोपे नागरिकांना पूर्णपणे मोफत उपलब्ध करून दिली जात आहेत. घर, सोसायटी, शेत किंवा सार्वजनिक ठिकाणी वृक्षलागवड करू इच्छिणाऱ्या नागरिकांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष कार्यालय, भगवा चौक, धुळे येथे संपर्क साधून वृक्षरोपे घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अभियानाच्या पहिल्या टप्प्यालाही मोठा प्रतिसाद मिळाल्यानंतर दुसऱ्या टप्प्यात आणखी एक हजार वृक्षरोपांचे वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### वृक्षसंगोपन करण्याचा संकल्प करा

या प्रसंगी प्रवीण मुर्तडक, विनोद रणमळे, आप्पा भडागे, मंगेश पिंगळे, किशोर बोरसे, पंकज शाह, भटू देसले, मयूर कुळकर्णी, सौरभ जवराल, ज्ञानेश्वर देवरे, बंटी गोरे, भावेश अहिरराव, गोकुळ येलमामे, आशिष गोरे, पवन खांडरे, गोपाल प्रजापत, विक्की गर्ग, योगेश निकम यांच्यासह भगवा चौक येथील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. युवासेना राज्य सहसचिव ॲड. पंकज गोरे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येत असून, केवळ वृक्षरोपांचे वितरण न करता प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे नियमित संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले. केवळ एक दिवसाची औपचारिकता नसून भविष्यातील पिढ्यांसाठी पर्यावरण समृद्ध करण्याची सामाजिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

पर्यावरणप्रेमी नागरिक या अभियानात सक्रिय सहभाग घेत असून, धुळे शहर अधिक हिरवेगार आणि प्रदूषणमुक्त करण्याचा संकल्प व्यक्त करत आहेत. यावेळी ॲड. पंकज गोरे म्हणाले, "वृक्ष हेच भविष्यातील जीवनाचे आधार आहेत. आज लावलेले एक झाड पुढील अनेक पिढ्यांना शुद्ध हवा, सावली आणि पर्यावरणाचा समतोल देणार आहे. त्यामुळे वाढदिवस, लग्न, स्मृतिदिन किंवा इतर सामाजिक कार्यक्रमांमध्ये वृक्षलागवड करण्याची परंपरा रुजविण्याची गरज आहे."

# प्रलंबित वनदावे म्हणजे केवळ आकडे नसून जिवंत माणसे

जन सम्राट टाईम्स

**ठाणे | प्रतिनिधी:** प्रशासनाने प्रलंबित आणि अमान्य वनदावे केवळ कागदावरील आकडे म्हणून न पाहता प्रत्येक दाव्यामागील कुटुंबाचे भविष्य लक्षात घेऊन संवेदनशीलतेने निर्णय घ्यावेत, असे स्पष्ट निर्देश आदिवासी विकास आढावा समितीचे अध्यक्ष (मंत्री दर्जा) तथा श्रमजीवी संघटनेचे संस्थापक ॲड. विवेक पंडित यांनी दिले. ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात वनहक्क कायदा, २००६ च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी वनहक्क दाव्यांची सद्यस्थिती, प्रलंबित प्रकरणे, अमान्य दावे आणि त्यावरील पुढील कार्यवाहीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. पंडित यांनी श्रमजीवी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनाही प्रत्येक पात्र आदिवासी दावेदाराला न्याय मिळवून देण्यासाठी गावागावांत सक्रियपणे पाठपुरावा करण्याचे आवाहन केले. वनहक्क कायदा हा केवळ जमीन वाटपाचा कायदा नसून आदिवासींवरील ऐतिहासिक अन्याय दूर करण्यासाठी संसदेने मंजूर केलेला महत्त्वाचा कायदा असल्याचे त्यांनी नमूद केले. बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी ग्रामस्तर व उपविभागीय समित्यांकडे प्रलंबित असलेले सर्व वनहक्क दावे सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत जिल्हास्तरीय समितीकडे पाठविण्याचे निर्देश दिले. तसेच ऑक्टोबर महिन्यात सर्व प्राप्त दाव्यांचा निपटारा करण्याचा प्रशासनाचा निर्धार असल्याचे त्यांनी सांगितले. सन २००२ च्या शासन निर्णयानुसार देण्यात आलेले पात्र-अपात्रतेचे दाखले पुरावा म्हणून ग्राह्य धरण्याबाबतही प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली असून, त्यामुळे प्रलंबित दाव्यांच्या निपटाऱ्याला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. बैठकीला जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव, अप्पर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, उपआयुक्त अविनाश चव्हाण, विविध विभागांचे अधिकारी तसेच श्रमजीवी संघटनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# जनआरोग्य शिबिराला धुळ्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

## ५ अँजिओप्लास्टी, १२ अँजिओग्राफी यशस्वी




जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या २२ जुलै रोजी होणाऱ्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री सचिवालयांतर्गत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, मंत्रालय यांच्या समन्वयाने राबविण्यात येणाऱ्या 'मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिर' अभियानांतर्गत धुळे जिल्हा रुग्णालयात विशेष हृदयरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात ५ रुग्णांवर यशस्वी अँजिओप्लास्टी तर १२ रुग्णांची अँजिओग्राफी करण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, पालकमंत्री जयकुमार रावल, राज्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर, मुख्यमंत्री सहाय्यता निधी प्रमुख रामेश्वर नाईक, आमदार अनुप अग्रवाल, आमदार राम भदाणे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हाधिकारी भाग्यश्री वीसपुते आणि जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार यांच्या सहकार्याने हे शिबिर आयोजित करण्यात आले. शिबिरात हृदयरोगाचे निदान, तपासणी, उपचार आणि जनजागृती करण्यात आली. डॉ. प्रांजल पाटील आणि डॉ. दीपक शिंदे या हृदयरोग तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली अँजिओप्लास्टी व अँजिओग्राफी यशस्वीरीत्या पार पडल्या. जिल्हास्तरावरच अत्याधुनिक हृदयरोग उपचार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला. कार्यक्रमास जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रविंद्र सोनवणे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. महेश भडांगे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. विवेक जाधव यांच्यासह जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, परिचारिका आणि आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

आरोग्य विभागाने नागरिकांना नियमित आरोग्य तपासणी करून हृदयविकाराची लक्षणे आढळल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घेण्याचे आवाहन केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या २२ जुलै रोजी होणाऱ्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री सचिवालयांतर्गत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, मंत्रालय यांच्या समन्वयाने राबविण्यात येणाऱ्या 'मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिर' अभियानांतर्गत धुळे जिल्हा रुग्णालयात विशेष हृदयरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# नंदुरबारमध्ये 'अमृत संवाद सेतू' उपक्रम; विद्यार्थी आणि प्रशासनात विश्वासाचा सेतू निर्माण

जन सम्राट टाईम्स




**नंदुरबार | प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांना प्रशासनाची कार्यपद्धती प्रत्यक्ष समजावी, नागरिकांमध्ये सुजाण नागरिकत्वाची भावना निर्माण व्हावी आणि विद्यार्थी व प्रशासन यांच्यात विश्वासाचे नाते दृढ व्हावे या उद्देशाने महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत)च्या वतीने 'अमृत संवाद सेतू' हा अभिनव उपक्रम नंदुरबार येथे उत्साहात पार पडला. नंदुरबार येथील तहसील कार्यालयात आयोजित या उपक्रमात तहसीलदार प्रदीपकुमार पवार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत तहसील कार्यालयाच्या विविध विभागांची सविस्तर माहिती दिली. पुरवठा विभाग, महसूल विभाग, निवडणूक विभाग तसेच तहसील कार्यालयाच्या अखत्यारितील विविध शासकीय कामकाज, योजना, नियम व अटी-शर्ती यांची माहिती विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष देण्यात आली.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना विविध शासकीय कार्यालयांना भेट देण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी कार्यालयीन कामकाज, शासनाच्या विविध योजना, नागरिकांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सेवा, प्रशासनातील पारदर्शकता आणि जबाबदाऱ्या याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. 'अमृत संवाद सेतू'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक जबाबदारी, संविधानिक मूल्यांची जाणीव आणि लोकशाही प्रक्रियेबाबत सकारात्मक दृष्टिकोन विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

तसेच विद्यार्थ्यांना शासनाच्या विविध विभागांचे कार्य जवळून समजून घेण्याबरोबरच त्यांच्या शंकांचे थेट निरसन करण्याची संधीही मिळाली. या उपक्रमामुळे विद्यार्थी आणि प्रशासन यांच्यात प्रभावी संवाद निर्माण होऊन परस्पर विश्वास अधिक दृढ होईल तसेच भविष्यात सुजाण, जबाबदार आणि राष्ट्रहिताची जाणीव असलेली नागरिकांची पिढी घडण्यास मदत होईल, असा विश्वास 'अमृत'च्या वतीने व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमात नंदुरबार येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) तसेच दुर्गाबाई रघुवंशी विद्यालय येथील विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि शिक्षकवर्ग सहभागी झाला होता. आगामी काळात विद्यार्थ्यांना इतर महत्त्वाच्या शासकीय कार्यालयांची माहिती मिळावी यासाठी अशाच प्रकारचे उपक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक योगेश अहिरे यांनी केले.

# महात्मा फुले हायस्कूलमध्ये पालक-शिक्षक सभा उत्साहात; नवीन कार्यकारिणी जाहीर

## पालक-शिक्षक संघ व माता-पालक संघाची सर्वानुमते निवड

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी:** धरणगाव येथील सुवर्ण महोत्सवी महात्मा फुले हायस्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ निमित्त पालक-शिक्षक सभा तसेच माता-पालक शिक्षक सहविचार सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. यावेळी पालक-शिक्षक संघ आणि माता-पालक संघाच्या नवीन कार्यकारिणीची सर्वानुमते निवड करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक जे. एस. पवार होते. सहविचार सभेचे प्रास्ताविक पालक-शिक्षक समिती प्रमुख पी. डी. पाटील यांनी केले. उपस्थित पालक आणि मान्यवरांचे शाळेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. सभेत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी पालक-शिक्षक संघाच्या अध्यक्षपदी मुख्याध्यापक जे. एस. पवार, उपाध्यक्षपदी सुनील सुक्राम भिल, सचिवपदी पी. डी. पाटील तसेच प्रत्येक वर्गातून दोन पालक प्रतिनिधींची सभासद म्हणून निवड करण्यात आली. माता-पालक



संघाच्या उपाध्यक्षपदी सुरेखा करोसिया तर सचिवपदी व्ही. पी. वऱ्हाडे यांची सर्वानुमते निवड झाली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या हस्ते ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर सर्व पदाधिकाऱ्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. पालक-शिक्षक समितीचे प्रमुख एच. डी. माळी यांनी पालक-शिक्षक संघाची उद्दिष्टे, शालेय शिस्त, शिष्यवृत्ती, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम आणि विविध स्पर्धांबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित चित्रकला व रांगोळी स्पर्धेत प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना कंपास पेटी, चित्रकला वही आणि पेन देऊन गौरविण्यात आले. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक जे. एस. पवार यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात शिक्षक आणि पालक या दोघांचीही तितकीच महत्त्वाची भूमिका असल्याचे सांगत, परस्पर समन्वयातून विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडविण्याचे आवाहन केले. या सभेला समाधान भिल, वेचान बारेला, महाग्या बारेला, अनिल भोई, विकी चंडाले, मनोज सोनवणे, नितीन चंडाले, रवी करोसिया, सुरेखा करोसिया, भारती चंडाले, अकिलशहा फकीर, उषा कुंभार, सुलोचना करोसिया, मनीषा बारेला, बापू भिल यांच्यासह शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी. डी. पाटील यांनी केले, तर आभार एच. डी. माळी यांनी मानले.

# शिरपूरजवळ अपघात; कंटेनरला इनोव्हाची मागून धडक

जन सम्राट टाईम्स

**धुळे। प्रतिनिधी :** राजस्थानातील अजमेर येथे देवदर्शन करून नाशिककडे परतणाऱ्या भाविकांच्या इनोव्हा कारला शिरपूरजवळ भीषण अपघात झाला. भरधाव इनोव्हा कारने महामार्गावरील कंटेनरला मागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर पाच जण गंभीर जखमी झाले आहेत.

अपघाताची माहिती मिळताच



शिरपूर पोलीस, महामार्ग वाहतूक पोलीस आणि आपत्कालीन यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाली. जखमींना तत्काळ बाहेर काढून उपचारासाठी शिरपूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

प्राथमिक माहितीनुसार, नाशिक येथील भाविक अजमेर येथील देवदर्शन करून इनोव्हा (एमएच-05 सीव्ही-1001) या वाहनातून परतत होते.

शिरपूरजवळ महामार्गावर पुढे असलेल्या कंटेनरला कारने मागून जोरदार धडक दिल्याने वाहनाचा समोरील भाग पूर्णपणे चुराडा झाला. या अपघातात दोघांचा मृत्यू झाला असून पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीवर वैद्यकीय अधिकारी लक्ष ठेवून आहेत. या घटनेचा पुढील तपास शिरपूर पोलीस करीत आहेत.

# भवरखेडे-विवरे विद्यालयात शिक्षक-पालक मेळावा उत्साहात

## मेळाव्यात माजी विद्यार्थ्याचा सत्कार




जन सम्राट टाईम्स

**भवरखेडे| प्रतिनिधी :** भवरखेडे येथील माध्यमिक विद्यालयात शिक्षक-पालक मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. शांताराम दाजीबा पाटील उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापिका सोनल पाटील तसेच गावातील नागरिक आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनींनी स्वागतगीत सादर करून उपस्थितांचे स्वागत केले. प्रमुख पाहुणे व पालकांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यालयाचा माजी विद्यार्थी अमोल रमेश पाटील याची एसआरपीएफ (SRPF) मध्ये निवड झाल्याबद्दल शाळेच्या वतीने त्याचा विशेष सत्कार करण्यात आला. त्याच्या यशाबद्दल उपस्थितांनी अभिनंदन करत विद्यार्थ्यांसाठी तो प्रेरणादायी आदर्श असल्याचे सांगितले. मुख्याध्यापिका सोनल पाटील यांनी प्रास्ताविकातून शिक्षक-पालक संवादाचे महत्त्व अधोरेखित केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. शांताराम पाटील यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी समन्वयाने काम करण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सविता पाटील व सुनीता लोहार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी एस. एस. पाटील, स्वप्निल पवार, आर. बी. ठाकरे, पंकज ठाकरे, अनिता पाटील तसेच शिक्षकेतर कर्मचारी गणेश पाटील व अजय बाविस्कर यांनी परिश्रम घेतले.

विद्यालयाचा माजी विद्यार्थी अमोल रमेश पाटील याची एसआरपीएफ (SRPF) मध्ये निवड झाल्याबद्दल शाळेच्या वतीने त्याचा विशेष सत्कार करण्यात आला. त्याच्या यशाबद्दल उपस्थितांनी अभिनंदन करत विद्यार्थ्यांसाठी तो प्रेरणादायी आदर्श असल्याचे सांगितले.

# तणावमुक्तीतून निरोगी जीवनशैली अंगीकारा : हेमंतकुमार भदाणे

## श्री मंगळग्रह मंदिरात आयसीडीएसअंतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळा

जन सम्राट टाईम्स

**अमळनेर | प्रतिनिधी** सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे प्रत्येकजण तणावग्रस्त होत असून, बदलत्या आहारपद्धतीमुळे आरोग्याच्या समस्याही वाढत आहेत. त्यामुळे तणावमुक्त राहण्यासाठी सकारात्मक विचार, सात्त्विक आहार आणि संतुलित जीवनशैलीचा स्वीकार करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जळगाव जिल्हा कार्यक्रम अधिकारी तथा जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी हेमंतकुमार भदाणे यांनी केले.

येथील श्री मंगळग्रह मंदिरात शनिवार (दि. १८ जुलै) रोजी एकात्मिक बालविकास सेवा योजना (आयसीडीएस) अंतर्गत आयोजित जिल्हास्तरीय कार्यशाळेत ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

कार्यशाळेला जळगाव जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील बालविकास प्रकल्प अधिकारी (सीडीपीओ), पर्यवेक्षिका तसेच महिला व बालविकास विभागातील अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेत श्री. भदाणे यांनी तणाव व्यवस्थापन, मानसिक आरोग्य आणि निरोगी




जीवनशैली या विषयांवर विविध उदाहरणांसह मार्गदर्शन केले. तसेच श्री मंगळग्रह मंदिराचे धार्मिक, सामाजिक आणि ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित करत मंदिरामार्फत राबविण्यात येणाऱ्या समाजोपयोगी उपक्रमांची माहिती दिली. यावेळी मंगळग्रह सेवा संस्थेचे सहसचिव दिलीप बहिरम यांनी संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. तसेच मंदिरातील धार्मिक परंपरा व पूजाविधींबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमात अमळनेरच्या सीडीपीओ सौ. हेमलता पाटील, पर्यवेक्षिका सौ. सुजाता चौधरी, सौ. भाग्यश्री पाटील, श्रीमती प्रीती देवरे तसेच त्यांच्या सहकाऱ्यांचा श्री. भदाणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### विविध सामाजिक उपक्रमांची माहिती

मंगळग्रह सेवा संस्थेचे सहसचिव दिलीप बहिरम यांनी संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिलीया प्रसंगी सौ. वर्षा भदाणे, पाचोऱ्याच्या सीडीपीओ संत मॅडम, जळगाव जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील सीडीपीओ, पर्यवेक्षिका व महिला व बालविकास विभागातील अधिकारी उपस्थित होते. तसेच मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव सुरेश बाविस्कर, विश्वस्त डी. एस. सोनवणे, मंगल सेवेकरी आर. टी. पाटील, व्ही. व्ही. कुलकर्णी, नंदू कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगळग्रह सेवा संस्थेचे जनसंपर्क अधिकारी शरद कुलकर्णी यांनी केले, तर श्रीमती प्रीती देवरे यांनी आभार मानले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306